MHKO100001072014

**नियमीत दिवाणी दावा क्र. ५१/२०१४**

वेणुताई गुरव.
//वि//
संतू गुरव वगैरे.

**निशाणी क्र. ७१ वर आदेश**

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.१ ते ६ यांनी त्यांचेविरुध्द झालेला "उलटतपास नाही" चा आदेश रद्द होऊन मिळणेसाठी दाखल केला आहे. वादीतर्फे प्रस्तुत अर्जास निशाणी क्र.७२ येथे म्हणणे दाखल केले. अर्ज व म्हणण्याचे अवलोकन केले. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला.

०२. प्रकरणाचे अवलोकन केले. वादी यांनी प्रस्तुतचा दावा हा वाटप, हक्कज्ञापन व कायम मनाईसाठी दाखल केलेला आहे. प्रस्तुत कामी वादी यांनी सा.क्र.१ म्हणुन स्वतःचे प्रतिज्ञापत्र निशाणी क्र.४१ अन्वये दिनांक १२/०३/२०२१ रोजी दाखल केलेले आहे. प्रतिवादी यांना संधी देऊन देखील त्यांनी साक्षीदाराचा उलटतपास न घेतल्याने दिनांक ०३/११/२०२३ रोजी उलटतपास नाही असा आदेश पारीत करण्यात आला होता. प्रस्तुतचा अर्ज दिनांक २३/०६/२०२५ रोजी दाखल केला आहे. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रकरण हे साक्षीदाराचे उलटतपासाकरीता ब-याच कालावधीपासुन प्रलंबीत आहे. त्याबाबत प्रतिवादी यांनी असे कारण नमुद केले आहे की, वादी व प्रतिवादी यांचेदरम्यान आपसातीची बोलणी चालू होती, त्यामुळे ऊलटतपास घेणेचे राहून गेले आहे. प्रकरणाची परिस्थिती व नमुद कारण पाहता सदर कारण संयुक्तीक वाटत नाही. परंतु, दाव्याचे स्वरुप पाहता दावा गुणदोषावर निकाली काढणेकरीता प्रतिवादींना बचावाची संधी देणेदेखील योग्य वाटते. प्रतिवादींमुळे झालेला विलंब व त्यामुळे वादी यांचे झालेले नुकसान याकरीता प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.१ ते ६ यांना प्रत्येकी रक्कम रु.१,०००/- प्रत्येकी अशी एकुण रक्कम रु.६,०००/- च्या खर्चासह मंजुर करणे योग्य होईल. सबब, खालील आदेश पारीत करण्यात येतो.

**-:आदेश :-**

०१. अर्ज रक्कम रु.६,०००/- (रुपये सहा हजार फक्त) च्या खर्चासह मंजुर करण्यात येतो.

०२. खर्चाची रक्कम प्रतिवादी क्र.१ ते ६ यांनी पुढील तारखेपर्यंत साक्षीदार यांना अदा करावी. तसे न झाल्यास प्रस्तुतचा आदेश रद्द समजण्यात यावा.

(खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला)

Digitally signed by SACHIN DURGASHANKAR MEHTA
Date: 2025.08.04 17:39:45 +0530

**( एस. डी. मेहता )**
सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
गडहिंग्लज.

गडहिंग्लज.
दिनांकः ०४/०८/२०२५.

**:: CERTIFICATE ::**

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of stenographer | R. D. Patil. |
| Name of Court | S. D. Mehta,<br>Jt. CJJD & JMFC, Gadhinglaj. |
| Date of Dictation | 04/08/2025 |
| Order signed by P.O. on | 04/08/2025 |
| Order uploaded on | 04/08/2025 |